




# ॥ ज्योतिर्मय ॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३१ वा ❑ शनिवार दि.५ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## इराणचा अनुकार्यक्रम अनियंत्रित होईल का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

इराणनं अण्वस्त्र तयार करु नये अशी इस्रायल आणि अमेरिकेची इच्छा आहे. त्यामुळे तो कोणत्याही परिस्थितीत इराणला रोखू इच्छितात. याच कारणास्तव इस्रायलनं इराणवर १३ जूनला हल्ला चढवला. तर अमेरिकेनं २२ जूनला इराणच्या अण्वस्त्र तळांवर बॉम्ब हल्ले केले. युद्धविरामानंतर आता इराणच्या संसदेनं महत्त्वाचं विधेयक मंजूर केलेलं आहे. इराणच्या संसदेनं बुधवारी एका महत्त्वाच्या विधेयकाला मंजुरी दिली आहे. संयुक्त राष्ट्र अणू निगराणी संस्थेसोबतचं सहकार्य थांबवण्याबद्दलचं विधेयक इराणी संसदेनं मंजूर केलं आहे.इराणने संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा निगराण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी () सोबतचे संबंध तोडण्याचा आणि सहकार्य स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.अमेरिकेच्या हवाई दलानं इराणमधील तीन महत्त्वाच्या अण्वस्त्र केंद्रांवर बॉम्ब हल्ले केल्यानंतर इराणी संसदेनं महत्त्वाचं विधेयक पारित केलेलं आहे.

त्यामुळे आता संयुक्त राष्ट्र अणू निगराणी संस्थेला इराणमधील अण्वस्त्र केंद्रांची पाहणी करता येणार नाही. अशा परिस्थितीत, प्रश्न असा आहे की इराणचा अणुकार्यक्रम कोणत्याही देखरेखीशिवाय अनियंत्रित होईल का? इराण नेमकं काय करतोय, याची माहिती जगाला मिळणार नाही.

तेहरानने नेहमीच अण्वस्त्रे विकसित करत असल्याचा इन्कार केला आहे आणि या महिन्यात इराणला अण्वस्त्र प्रसारबंदीच्या दायित्वांचे उल्लंघन करणारा म्हणून घोषित केलेल्या च्या ठरावामुळे इस्रायलचा हल्ला सोपा झाला असे ते म्हणतात. ने इराणच्या अण्वस्त्र स्थळांवरील हल्ल्यांचा निषेध करण्यासही नकार दिला आहे, ज्यामुळे त्यांची आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता धोक्यात आली आहे, असे कालिबाफ यांनी म्हटले आहे.

इराणी संसदेनं मंजूर केलेलं विधेयक आता संरक्षण समितीकडे जाईल. भविष्यात आंतरराष्ट्रीय अणू ऊर्जा एजन्सीला (आयएईए) इराणमधील कोणत्याही अण्वस्त्र केंद्रात जाऊन पाहणी करायची असल्यास त्यांना राष्ट्रीय सुरक्षा परिषदेची परवानगी लागेल. याबद्दल इराणच्या सरकारी माध्यमांनी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर कलीबाफ यांच्या हवाल्यानं महत्त्वाची माहिती दिली आहे. इराण आता त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला अधिक गती देईल, असं कलीबाफ यांनी म्हटलेलं आहे.

या विधेयकानुसार, अणु सुविधांच्या सुरक्षेची हमी मिळेपर्यंत पाळत ठेवणारे कॅमेरे बसवणे, तपासणीला परवानगी देणे आणि एटॉमिक एनर्जी एसोसिएशनला अहवाल सादर करणे हे काम निलंबित केले जाईल, असे तेहरानच्या तस्निम वृत्तसंस्थेने सोमवारी (२२ जून २०२५) समितीचे प्रवक्ते इब्राहिम रेझाई यांच्या हवाल्याने वृत्त दिले. तथापि, संसदेने या संदर्भात पूर्ण सत्रात विधेयक मंजूर करावे लागेल.

इराणकडे अणुबॉम्ब बनवण्यासाठी साहित्य आहे

इस्रायल–इराण संघर्षादरम्यान, अमेरिकेने इराणच्या तीन प्रमुख अणुस्थळांवर, इस्फहान, फोर्डो आणि नतान्झवर हल्ला केला. या हल्ल्यामुळे इराणचे अणुबॉम्ब बनवण्याचे स्वप्न भंगले असल्याचा दावा अमेरिकेने केला. तथापि, इराणने असा दावा केला की हल्ल्यामुळे अणुबॉम्ब बनवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व सामग्री नष्ट झालेली नाही. त्याच वेळी, अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनी सांगितले की इराणकडे अजूनही ९ अणुबॉम्ब बनवण्यासाठी पुरेसे साहित्य शिल्लक आहे.

इराणच्या निर्णयावर इंटरनेशनल एटॉमिक एनर्जी एसोसिएशनचे मौन

इराणी संसदेने मंजूर केलेल्या विधेयकावर इंटरनेशनल एटॉमिक एनर्जी एसोसिएशन ने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. इंटरनेशनल एटॉमिक एनर्जी एसोसिएशन चे प्रमुख राफेल ग्रोसी यांनी बुधवारी सांगितले की ते इराणच्या ठिकाणी निरीक्षकांना परत पाठवण्याची मागणी करत आहेत. यामध्ये १३ जून रोजी इस्रायली हल्ल्यांपर्यंत युरेनियम समृद्धीकरण चालू असलेल्या प्लांटचा देखील समावेश आहे. इस्रायली हल्ल्यांमुळे आणि भूमिगत अणु सुविधांवर अमेरिकेच्या बॉम्बहल्ल्यामुळे अणु स्थळांना किती नुकसान झाले याबद्दल अद्याप कोणतीही माहिती नाही. इंटरनेशनल एटॉमिक एनर्जी एसोसिएशनची स्थापना २९ जुलै १९५७ रोजी झाली आणि इराण १६ सप्टेंबर १९५८ रोजी त्यात सामील झाला.






# साहित्य संमेलनाला सर्वतोपरी सहकार्य– मुख्यमंत्री

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई –** साताऱ्यात मसाप शाहूपुरी शाखा आणि मावळा फाऊंडेशनच्यावतीने ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. त्याची जोरदार तयारी सुरू आहे. त्यासंदर्भात मराठी साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. साताऱ्यात तब्बल ३२ वर्षांनंतर ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची निवड झाली. याची माहिती देण्यासाठी शिवेंद्रसिंहराजे यांच्या नेतृत्वाखाली संयोजन करणाऱ्या संस्था, मराठी साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी संमेलन आणि मराठी भाषेच्या विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा झाली. यावेळी सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

साताऱ्यात मसाप शाहूपुरी शाखा आणि मावळा फाऊंडेशनच्यावतीने ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. त्याची जोरदार तयारी सुरू आहे. नियोजनाबाबत विविध बैठका सुरू आहेत. साताऱ्यातील संमेलनाच्या आयोजनातील महत्त्वाच्या गोष्टींबाबत चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.

यावेळी शिवेंद्रसिंहराजे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी,



कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, मसाप शाहूपुरी शाखेचे उपाध्यक्ष विक्रम पाटील, महेश सोनावणे, उद्योजक प्रसन्न देशमुख, जनता बँकेचे अध्यक्ष अमोल मोहिते, संचालक अक्षय गवळी, मसाप शाहूपुरी शाखेचे सदस्य राजेश जोशी, वेदांत जोशी आणि मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे संमेलनाची तयारी गतिमान होणार आहे.

**शिवेंद्रसिंहराजेंचे अभिनंदन**

३२ वर्षांपूर्वी साताऱ्यात झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अभयसिंहराजे भोसले होते. त्यानंतर आता होत असलेल्या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी शिवेंद्रसिंहराजे यांची निवड झाल्याचे विनोद कुलकर्णी यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिवेंद्रसिंहराजे यांचे अभिनंदन केले.

# श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीला (तंत्रनिकेतन) 'अतिशय उत्तम' मानांकन !

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** येथील श्रीयश प्रतिष्ठानचे श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (तंत्रनिकेतन) यांनी महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत मॉनिटरिंग (२०२४–२५) अंतर्गत घेतलेल्या मूल्यांकनात ''Very Good'' (अतिशय उत्तम) हे मानांकन मिळवले आहे. विभागीय पातळीवर मिळवलेले गौरवशाली मानांकन: मॉनिटरिंग दरम्यान खालील सर्व विभागांना 'Very Good' रेटिंग प्राप्त झाले आहे:

१. आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग २. सिव्हिल इंजिनीअरिंग ३. कॉम्प्युटर इंजिनीअरिंग ४. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग ५. मेकॅनिकल इंजिनीअरिंग

६. इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग

मूल्यमापनातील मुख्य घटक : मॉनिटरिंग प्रक्रियेत महाविद्यालयाच्या शिक्षण गुणवत्तेचे, प्रकल्प व संशोधन कार्याचे, विद्यार्थ्यांचा सहभाग, इन्फ्रास्ट्रक्चर, आणि खालील बाबींचे बारकाईने परीक्षण करण्यात आले:

गुणवत्तापूर्ण अध्यापन पद्धती, इंडस्ट्रीसह समन्वय व इंडस्ट्रियल व्हिजिट्स, गेस्ट लेक्चर्स व तज्ज्ञांचे मार्गदर्शन,

प्रयोगशाळांची उपलब्धता व कार्यक्षमता, विद्यार्थ्यांच्या अभिप्रायानुसार सुधारणा, नियोजनबद्ध अकॅडेमिक ॲक्टिव्हिटीज, प्लेसमेंट प्रयत्न व कंपन्यांशी संबंध

प्रगत माहिती–तंत्रज्ञान सिस्टीम्सचा वापर

या गौरवप्राप्त यशानंतर संस्थेचे अध्यक्ष इंजी. बसवराज मंगरुळे यांनी प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

संस्थेच्या गुणवत्तेचा वारसा कायम ठेवत शिक्षणाच्या प्रत्येक क्षेत्रात पुढाकार घेण्याची वचनबद्धता संस्थेने दाखवली आहे. या मानांकनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल आणि संस्थेची शैक्षणिक विश्वासार्हता आणखी मजबूत होईल.

# श्रीयश फार्मसीचे ४७ विद्यार्थी नायपर आणि जी पॅट परीक्षा उत्तीर्ण

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयातील बी. फार्म पदवीचे विद्यार्थी यांनी राष्ट्रीय स्तरावरील नायपर (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च) व जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी ॲप्टिटयूड टेस्ट) २०२५ या महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करत संस्थेचे नाव उज्वल केले आहे. एवढ्या मोठया संख्येने, कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण होणारे श्रीयश फार्मसी हे पहिलेच महाविद्यालय ठरले आहे.

या दोन्ही परीक्षांमध्ये एकूण २२ विद्यार्थी नायपर तर २५ विद्यार्थी जीपॅट परीक्षेत यशस्वी झाले आहेत. विशेष म्हणजे, १५ विद्यार्थ्यांनी दोन्ही परीक्षा उत्तीर्ण करून एक वेगळाच उच्चांक प्रस्थापित केला आहे.

ऋषिकेश फटाले, संघप्रिय बनकर, प्रिया उणे, रितेश ठोंबरे, अभिषेक डेंगळे, साक्षी मार्खेलकर, साक्षी सुराशे, शुभदा नावेर्कर, श्रीकृष्णा खेडकर, साक्षी कानडे, पायल आडे, पायल गवळी, कैलास कर्पे, स्नेहा खंदारे आणि वैष्णवी बांगर या विद्यार्थ्यांनी नायपर व जीपॅट दोन्ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्या आहेत.

संस्कृती गिरी, अंकिता आढाव, प्रतीक्षा मनगटे, अपूर्वा गव्हाणे, रत्नमाला मंडले, चैतन्य जगताप आणि प्रियंका गायकवाड हे विद्यार्थी केवळ नायपर मध्ये तर कल्याणी वर्मा, दिनांशु बाराते, श्रुती जोगी, श्रुती पद्मे, सुमित बारतूने, प्रीती खरात, संध्या शेजूळ, रोशनी पावरा, पवन गागलवाड आणि कोमल पोटे यांनी जीपॅट परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. ह्या यशासाठी सातत्याने प्रयत्न आणि मार्गदर्शन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरूळे, प्राचार्य डॉ. गणेश तापडिया आणि प्राध्यापकांचे आभार मानले.

# वडाळा गावचे तीर्थक्षेत्र श्रीप्रतिपंढरपूर

ज्योतिर्मय साहित्य

आषाढी एकादशी म्हणजे पंढरीचा मानाचा दिवस. आपल्या या विठुरायाचे दर्शन घेण्याच्या लगबगीने सारे वारकरी वारी करीत पंढरीची पायी वाटचाल करीत असतात. टाळ मृदुंग, ग्यानबा– तुकाराम, जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठल या जयघोषात या विठुरायाचे नामस्मरण करीत वारकरी विठ्ठलाच्या नामस्मरणात लीन होताना दिसतात.

प्रत्येक विठ्ठलभक्ताला आपल्या देवाचे दर्शन व्हावे असे वाटत असते. परंतु प्रत्येकालाच वारीला जाण्याची संधी मिळेलच असे नाही. असंच मुंबईकरांच्या बाबतीत काही दिसून येते. मुंबई मधील भक्तांना या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही. अशावेळी हे भक्त मुंबईतील वसलेल्या वडाळा गावांत '' प्रतिपंढरपूर '' या मंदिरात वारी काढतात. मुंबईतील पंढरीत टाळ मृदुंगाचा नाद, वैष्णवांचा मेळा, भगवा पताका, विद्युत रोषणाई हे सारे दृश्य पाहायला मिळते. अशाच मुंबईतील प्रसिद्ध प्रतिपंढरपूर '' म्हणजेच वडाळा गांवातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिराचा विस्तार वाढवण्यात आला असून मंदिराचा कळस हा भागवतभक्त सोनोपंत दांडेकर यांनी बसवला होता असे सांगितले जाते. मुंबईतील ज्यांना पंढरपूर येथे जाणे शक्य होत नाही,




त्यांच्यासाठी हे मंदिर एक प्रतिपंढरपूर म्हणून उभे आहे. मंदिरात आषाढी एकादशीला लाखो भाविकांची गर्दी दिसून येते. मुंबईतील कुलाबा आणि अनेक ठिकाणाहून येथे वारक–यांच्या दिंड्या येतात. जत्रेचा उत्साह ही असतो. असे हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्ण संगमरवरी आहे. मंदिरात प्रथम प्रवेश करताना आपल्या नजरेस पडते ती काळ्या पाषाणातील गरुड देवाची मूर्ती, बाजूला शनी देवाचे मंदिर, आत गेल्यावर श्री. मारुतीरायाची मूर्ती, पुढे गेल्यानंतर मुख्य गाभा–यात दर्शन घडते सुंदर काळ्या पाषाणातील विविध आभूषणे आणि अलंकाराने नटलेली विठ्ठल–रखुमाईची मूर्ती. या मंदिरच्या उजव्या बाजूला महादेवाचे मंदिर असून डाव्या बाजूला श्रीदत्त, देवीचे गणपतीचे मंदिर आहे, मंदिरात पहाटे काकड आरती, दुपारी १ आणि सायंकाळी ७ वाजता आरती तर रात्री ९.३० वाजता शेजारती होत असून दररोज सायंकाळी ५ ते ७ वाजता आणि रविवारी ४ ते ७ हरिपाठ प्रवचन असा हा मंदिराचा कार्यक्रम असतो. दशमीपासून भजन सुरु होऊन ते आषाढी एकादशीच्या रात्री पर्यंत भजन सुरु असते. आषाढीला लाखो वैष्णवांचा मेळा भरतो संपूर्ण मंदिर हरिनामाच्या जपाने दुमदुमून जातो. मंदिरातील विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींची पूजा आषाढी एकादशीला राजकीय पुढारी व्यक्तींच्या हस्ते केली जाते.



दिनेश जयराम हुमणे
डोंबिवली

मुंबईतील प्रसिद्ध मंदिरांपैकी हे एक विठ्ठल रुक्मिणी मंदिर. मंदिर पुरातन असून जवळ जवळ ४०० वर्षे जुने आहे. या मंदिराच्या स्थापनेविषयाची गोष्ट ऐकण्यासारखी आहे. पूर्वी मुंबई हि सात बेटांची होती. त्यातील वडाळा हे एक बेट किंवा गांव. वडाळा गांव हे प्रसिद्ध होते, ते येथील मिठागरांसाठी. अशा या मिठागरात लमाणी, शेतकरी, कोळी, आगरी अशी अनेक लोक राहत होते. मिठाचा व्यापार करणे या त्यांचा व्यवसाय. व्यापार करणारे व्यापारी हे विठ्ठलाचे आणि तुकाराम महाराजांचे भक्त असून ते नित्यनियमाने वारीला पंढरपूरला जात असे. एक दिवशी काम करताना या मिठागरात काम करणा–या विठ्ठल– रखुमाईच्या मूर्ती सापडल्या. सदर घटना व्यापा–यांनी पंढरपुरास जाऊन तुकाराम महाराजांना सांगितली असे म्हणणे आहे, त्यांनी सांगितले या मुर्त्या ज्या ठिकाणी सापडल्या त्या ठिकाणी विठ्ठल–रखुमाईचे मंदिर स्थापन करा. व्यापा–यांनी त्या परिसरात एक तळ होतं तेथे मंदिर उभारले. मंदिराचा विकास होत गेला तस तसे या मंदिराचा पाय रचत गेला. आणि आज या मंदिरात गेल्यावर समाधान मिळाल्याशिवाय बाहेर येऊच शकत नाही. ही खरी मंदिराची ख्याती आहे. म्हणून हे विठ्ठल रुक्मिणी मंदिर ''प्रतिपंढरपूर '' तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

***




## जात्यावरच्या ओव्या......

चाल चाल बहिणी !!
किती चालू रे बंधवा?
तुझ्या छत्रीला गोंडे
माझ्या चोळीला चांदवा ॥१५३॥

चाल नको म्हणू,
संगती गेलेत जाउदे,
सरुच्या झाडाखाली
मला इसावा घेऊदे ॥१५४॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## पंढरीची वारी




ज्योतिर्मय साहित्य

'नामाचा गजर, गर्जे भीमातीर' हा भीमसेन जोशींच्या आवाजातील अभंग ऐकला की मन नकळत पंढरपूरच्या वाटेवर जाऊन पोहचते. समोर सावळ्या विठ्ठलाची मूर्ती दिसू लागते. ग्यानबा तुकारामाच्या तालावर ठेका धरीत विविध पालख्या आणि लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने निघाले आहेत. तुकोबांची पालखी देहूहून आणि ज्ञानोबांची पालखी आळंदीहून निघाली आहे. त्यांच्यासोबतच महाराष्ट्राच्या विविध भागातून निरनिराळ्या संतांच्या पालख्याही पंढरीकडे मार्गक्रमण करू लागल्या आहेत.


पावसाला नुकतीच सुरुवात झाली आहे. मृद्गंध वातावरणात पसरला आहे. आणि अशा वेळी विठ्ठल भक्तीची नशा आमच्या वारकऱ्याना चढली आहे. गावागावातून जसे लहान ओढे, नाले नदीला जाऊन मिळतात तशा या गावागावातून निघणाऱ्या पालख्या, दिंड्या पंढरपूरच्या वाटेकडे जाणाऱ्या नदीला जाऊन मिळतात. या दिंड्या पंढरीच्या सागरात विलीन होणार आहेत. नदी सागराला भेटायला ज्या ओढीने जाते तशा या दिंड्या, पालख्या विठुरायाच्या ओढीने निघाल्या आहेत.



पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे शांततेने, नित्यनियमाने दरवर्षी लाखो भाविक नामस्मरण करीत त्या सावळ्या परब्रह्माच्या ओढीने जातात हे चित्र दुसरीकडे कुठेही आढळणार नाही. काळ बदलला. विविध राजे, साम्राज्ये आली आणि गेली. वारी मात्र सुरूच राहिली किंबहुना वाढतच गेली. तेराव्या शतकापासून वारीचे उल्लेख आढळतात. ज्ञानदेवांच्या पूर्वजांनी सुद्धा वारीची परंपरा जपली होती. त्यानंतर तुकोबांच्या घरातही वारीची परंपरा होती. संत एकनाथांनी सुद्धा आपल्या घराण्यातील वारीची परंपरा सांभाळली. या सावळ्या विठुरायाच्या प्रेमात अनेक संत पडले. त्यांनीही वारी सुरु केली. आणि आज शेकडो संतांच्या पालख्या आषाढी एकादशीला पंढरपुरात दाखल होतात. त्यात लाखो लोक सहभागी होतात.

ऊन, वारा, पाऊस या कशाचीच तमा न बाळगता हे वारकरी वारीत चालत असतात. अंगात पांढरे शुभ्र स्वच्छ कपडे असतात. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर बुक्का वा गोपीचन्दनाचा टिळा लाऊन ही मंडळी वारीत सामील होतात. वारीमध्ये विविधतेत एकता पाहायला मिळते. जातीभेद, वर्णभेद सगळे गळून पडतात. उच्चनीच भाव नसतो. सारेच एकमेकांना वंदनीय. सारेच विठ्ठलाचे मूर्त रूप. म्हणून सारेच एकमेकांना माउली म्हणून हाका मारीत असतात. एकमेकांच्या पाया पडतात. सगळ्यात मोठी माऊली कोणती ? तर ती विठू माऊली. त्याच्या खालोखाल ज्ञानोबा, तुकाराम आणि इतरही सारे संत या संतानाही माउलीचीच उपमा दिली जाते. कारण संतांचे हृदयच माऊलीचे असते. ऐशी कळवल्याची जाती करी लाभाविण प्रीती. त्यांना कुठलाही स्वार्थ साधायचा नसतो. लोकांनी प्रपंच आणि परमार्थ दोन्ही चांगल्या प्रकारे करावेत अशीच संतांची धडपड असते. आणि प्रपंच करता करता हळूहळू नामस्मरणात रंगून जावे आणि प्रपंचातील लक्ष कमी करत मोक्षमार्गाकडे वाटचाल करावी हाच त्यांचा उद्देश असतो.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सख्यभक्ति

ज्योतिर्मय साहित्य


आपण तर प्रापंचीक माणसे आहोत. आजच्या काळात ऊदा द्यायचे झाले तर मी समर्थ वचनावर विश्वास ठेऊन सांगावेसे वाटते की संसारी लोकांनी सुध्दा शुध्द प्रेम करावे. आपलं कुटुंब, कुटुंबातील इतर माणसे यांना प्रेमाने बांधून ठेवावे. कुणीही कुणाचा अनादर करू नये. आजच्या भौतिक जगाचा विचार केला तर सर्व भौतिक साधने मिळून सुध्दा माणूस सुखी नाही. कारण त्याला प्रेमाची भाषाचं कळली नाही। त्यासाठी तरी दासबोधाचे वाचन करावे या समासात समर्थ सांगतात त्या प्रमाणे पतीपत्नी ने एकमेकांना समजून घेऊन संसार करावा. टोकाचं पाऊल कुणीही ऊचलु नये. माणसाचा जन्म एकदा मिळाला आहे तर तो सात्विक तेने जपावा व संस्कृती सांभाळून संसार करावा. एकमेकांचे ऊणेदुणे काढून आयुष्याचं मातेरं करू नये. हा संदेश आजच्या घडीला समर्थ देतात. थोडक्यात माणसांत भगवंत पहा.

देव परम दयाळू आहे. करूणासिंधु आहे. प्रेमसंपादन कलेमध्ये देवाइतका प्रवीण कोणी नाही म्हणून देवावर अत्यंत प्रेम करावे. त्याला शरणागत व्हावे आपले अंतरंग त्याच्यापुढे उघडे करावे. तो करूणेचा सागर आहे. त्याला आपल्या भक्तांचा विसर कधीच पडत नाही. आपल्या लक्षात येत नाही पणतो अनंत संकटातून आपल्याला सहीसलामत बाहेर काढतो. हे आपल्या भक्तिचं फळ असतं. आपल्याला माकडीण व तिचे पिल्लू यांची गोष्ट माहिती आहे. आई वेळ पडली तर पिलाला पाया खाली घेते पण शरण आलेल्या भक्ताला देवाने ठार मारले असे कुणी पाहिले नाही व ऐकले पण नाही.

थोडक्यात काय तर आईबाप, पतीपत्नी, गणगोत, विद्या, लक्ष्मी, पैसाआडका, ऐश्वर्य सगळं काही आपलं भगवंत आहे. मित्रांनो सख्यभक्ति मला जेवढी समजली तेवढी सांगण्याचा प्रयत्न केला काही अधिक ऊणे झाल्यास समर्थ क्षमा करतील अशी आशा करून सख्यभक्ति हा समास आज पुरा करते. जय जय रघुवीर समर्थ

श्री राम जय राम जय जय राम

## देहमनाने व्हावे रामार्पण ।



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवंताची उपासना । दूर करी सर्व यातना ।। चित्ताची स्थिरता । भगवंताच्या उपासनेत निश्चितता ।। देह जरी जीर्ण फार । तरी वासनेचा जोर अनिवार । हे जाणून चित्ती । एक भजावा रघुपति।। हृदयी करता भगवंताचे ध्यान । नामाविण उच्चार दुजा न जाण । त्यात व्यवहाराचे जतन । न दुखवावे कोणाचे अंत:करण । असा नेम ज्याच्यापाशी । राम तेथील रहिवाशी ।। मी रामाचा, रामा तू माझा । हाच अखंड असावा हव्यास ।। ऐसे ध्यावे रामाला । की जे जीव प्यार झाले मला ।। आता याहून दुजे न सांगणे काही । रामाविण जगू नाही ।। जे जे होणार ते होतच जाते । ते भगवंताच्या इच्छेने घडते । ऐसे आणणे मना। याचे नाव उपासना ।। अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ।। स्वार्थरहित रामसेवा । याहून लाभ दुजा न जीवा ।। राम ठेवा मनी । तो ध्यात जावा मानसपूजनी ।। वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंताची सेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण राहावे रामार्पण । याहून अन्य सेवा कोणतीहि न जाण ।।

उपासना असावी बळकट । तेथे नसावी कशाची अट ।। उपासनेचा असावा जोर । ज्याने होईल मन स्थिर ।। आपले जीवन ज्याचे हाती । त्याची नेहमी ठेवावी संगति ।। जे जे काही मी करावे । त्याला परमात्मा साक्षी हे जाणावे ।। मनी न सोडावा धीर । आहे म्हणावे माझा रघुवीर ।। करावे भगवंताचे चिंतन । होईल स्वत:चे विस्मरण ।। सर्व आहे रामाधीन । आपण निमित्ताला कारण ।। रामावर ठेवावे चित्त । जैसे प्रपंची असावे वाटते वित्त ।। उपासनेचे नर । त्यांनी राहावे खबरदार ।। आजवर केली भगवंताची उपासना । पुढे त्यात न येऊ द्यावा उणेपणा ।। सर्वांचे ऐकावे । परी उपासनेपासून दूर न व्हावे । राम माझा देता घेता । राम माझ्या भोवता ।। रामाविण जगी दुजे । न ठेवावे आणिक परते ।। एक सद्गुरुआज्ञा प्रमाण । हीच रामसेवा जाण ।। थोर थोर ऋषिमुनि । यति संत साधु यांनी । एकच केले खास । रामावाचून न राहू दिले जीवास ।। ठेवावा रामावर पूर्ण विश्वास । न करावे उपासतापास ।। उपासनेत राहावे आपण । हेच रामाचे सान्निध्य जाण ।। स्वार्थरहित सेवा । तीच पावे देवाधिदेवा ।। जे जे होते काही । ते ते राम करतो पाही । हा एकच विश्वास । समाधानाचा मार्ग सत्य खास ।। जेथे परमात्म्याची सत्ता । तेथे न चाले कोणाचे सर्वथा । म्हणून परमात्मा ठेवील त्यामध्ये । समाधान राखीत जावे ।।

चित्ती भगवंताचे ध्यान । आपण राहावे रामार्पण । याहून अन्य सेवा कोणतीहि न जाण ।।

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत जनाबाई यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

या अभंगावर अनेक विद्वान, विचार करताना जनाबाई यांनी जनमानसात, भूतमात्रात हरी पहावा असे सांगितले आहे असा अर्थ काढतात. म्हणजे जनाबाई यांनी भूतमात्रांना केवळ हरी रूपात पाहिले, किंवा मानले असा अर्थ यांच्या कथनातून ध्वनीत होतो.

पण त्यांनी मला हरी दिसला असं म्हटलं आहे मी मानला असं म्हटलेलं नाही. मानने ही खूप प्राथमिक स्थिती आहे. आणि प्रत्यक्षात तसा अनुभव येणे, तसे दिसणे ही साधन मार्गातील खुप उच्च स्थिती आहे.

या अभंगाला सुरुवात करण्यापूर्वी आपण प्रथम अविद्या कशाला म्हणावे हे पाहूयात.

प्रकृती, माया ही त्रिगुणात्मक आहे असे म्हटले जाते. सत्वगुण रजो गुण व तमो गुण.

संपूर्ण विश्व हे तमो गुण प्रधान बनून क्लेश रूप झालेले आहे. तम गुण म्हणजेच अविद्या आहे. हा अविद्या भाग राग, द्वेष, मोह,अस्मिता व अभिनिवेश या भेदाने चार भागात विभक्त झालेला आहे. बुद्धी तील या चार प्रकारच्या आक्रमणामुळे जीवात्मा दु:ख भोगतो. क्लेश प्रधान विश्वात राहणारे जीव मात्र विषयासक्त असतात. यात रजो गुणही अधिक वाढलेला असतो. म्हणजे तमाशी जवळचे नाते जोडलेला असतो. यामुळे क्लेशवतच असतो. रजो गुण ही कामनामयी प्रकृतीचे मूळ आहे.ही कामनाच विषयासक्तीची जननी आहे.

सत्वगुण हा विद्या भाग आहे. बुद्धीतील विद्या भाग वैराग्य, ज्ञान, ऐश्वर्य व धर्म या भेदाने चार भागात विभक्त आहे. हे चार ''भग'' आहेत. हे चार भग अंगी असणारा तो भगवान

अध्यवसायो बुद्धी धर्मो ज्ञान विराग ऐश्वर्यं/
सात्विक मेद्रुपंम् तामसमेतत् विपर्यस्तम्//
( सांख्यशास्त्र)

ज्या बुद्धीत राग द्वेष अविद्या मोह अस्मिता व अभिनिवेश या क्लेशांचे संस्कार शिगेला पोहोचलेले असतात अशा बुद्धीला गीतेत अव्यवसायी बुद्धी म्हणतात.

जहा कुमती तह वीपदी निराना

अशा बुद्धीत विविध वाद मतमतांतरे, शंका, कुशंका, संशय, तर्क, वितर्क या असुरी संपत्तीचे आवेश दिसतात.

आपण स्वत: चे निरीक्षण करुन पाहुयात.आपल्या बुद्धीत अनेक वेळा तर्क वितर्क संशय हे आपण आलेले पाहतो. याचाच अर्थ आपली बुद्धी ही अविद्या किंवा अव्यवसायिकात्मक बुद्धी आहे हे निश्चित.

याचा अर्थ ज्यावेळेस आपण रजोगुणी किंवा तमोगुणी व्हायला लागतो त्यावेळेस राग द्वेश ,मोह ,अस्मिता अभिनवेश हे चार क्लेश उत्पन्न होतात व या क्लेशांनाच अविद्या असे म्हटलेले आहे. सत्व प्रधान प्रकृतीत भग चार प्रकारचे आहेत ते वैराग्य ज्ञान,ऐश्वर्य व धर्म याप्रमाणे. साधना करण्याचा मूळ उद्देश हा आपल्या बुद्धीतील, मनातील रक्तातील, रज आणि तम भाव नष्ट करून त्या जागी शुद्ध सात्विक भाव निर्माण करणे हा होय. व हे निर्माण करण्याची प्रक्रिया व वरील अविद्या रुपी चार भेद नष्ट करण्यासाठी जो औषध उपचार करण्यात येतो त्यास योग म्हणतात. संत जनाबाई यांचा साधन मार्गातील एक अत्यंत उच्च अनुभव त्यांनी या अभंगातून विशद केला आहे.

जेव्हा पंचप्राण एकत्रित येतात तेव्हा ब्रह्मग्नि पेटतो. हा ब्रह्मग्णी किंवा योगाग्नी सुशुमनेतून वर सहस्त्रार चक्राकडे सरकतो ,तेव्हा विकारांचे बीज नष्ट व्हायला सुरुवात होते. प्रचंड साधना, नखशिखांत पसरलेला योगाग्णी, उपाशी राहून शरीरातील धगधगता अग्नी सहन करून कित्येक दिवस पूर्ण निष्ठेने, श्रद्धेने आणि उत्तम भाव स्थितीत ही साधना पूर्ण करत गेलो की प्राण मन बुद्धी व अहंकार हे चार ईश्वराचे अंश खाली विषय व्यक्ती व वस्तू यांच्याकडे न वळता उलट बाजूस फिरतात व ते प्राण मन आणि अहंकार हे बुद्धीत विलीन होतात. प्राण उर्ध्वरेता होऊन पूर्ण अग्नीरूप झालेला असतो. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं प्रभातसमये नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यमपराह्ले नमो नमः।। २४ ।।**

जगदंबिके, तुला प्रभात समयी नमस्कार असो. जगदंबिके, तुलादुपारचे समयी नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं सन्ध्यायां ते नमो नमः।**
**निशायां च नमो मातः नमस्तेऽस्तु सदा सदा।। २५।।**

जगदंबिके, तुला संध्याकाळी त्रिवार नमस्कार असो. रात्रीचे समयी नमस्कार असो. तुला सदा सदा नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं वरप्रदे धनप्रदे।**
**धान्यप्रदे नमस्तुभ्यं स्वास्थ्यप्रदे नमो नमः।। २६ ।।**

हे वरदायिनी, धनदायिनी, जगदंबिके, तुला नमस्कार असो. धान्यदायिनी, स्वास्थ्यदायिनी, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं दयावति कृपावति।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं सद्वंशवृद्धिहेतवे।। २७ ।।**

दयावती, कृपावती, जगदंबिके, तुला नमस्कार असो. सद्वंशवृद्धीसाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो.




## शंख वाजवण्याचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

शंख वाजवने आरोग्यासाठी ही उत्तम आहे हे कमी लोकांनाच माहीत असेल.. तर बघू रोज शंख वाजवण्याचे काय फायदे आहेत...

**स्नायू मजबूत होतात**

शंख वाजवणे मूत्र पथ, मूत्राशय, पोटाचा खालील भाग, डायाफ्राम, छाती आणि मानेच्या स्नायूंसाठी उत्तम ठरतं. याने या सर्व अंगांचा व्यायाम होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे याने गुदाशयाचे स्नायू मजबूत होतात.

**फुफ्फुसाच्या स्नायूंचा विस्तार होतो**

शंख वाजवण्याने प्रोस्टेट क्षेत्रावर दबाव पडतो आणि याने प्रोस्टेट स्वास्थ सुधारतं. हे प्रोस्टेट वृद्धी रोखण्यात मदत करतं.फुफ्फुस निरोगी ठेवण्यासाठी व फुफ्फुसाच्या स्नायूंचा विस्तार होता आणि श्वास घेण्याची क्षमता वाढते.

ग्रंथीत सुधार

शंख वाजवल्याने थायरॉईड ग्रंथी आणि वोकल कोड्सचा व्यायाम होतो.

**बोलण्यात स्पष्टता**

यामुळे आपल्या बोलण्यात स्पष्टता येते आणि बोलण्यासंबंधी समस्या दूर होतात. बोबडे बोलणाऱ्या मुलांना शंख वाजवायला हवा याने त्यांची वाणी सुधारेल.

**सुरकुत्या दूर होतात**

शंख वाजवताना चेहऱ्याचे स्नायू खेचले जातात याने फाईन लाइन्स आपोआप दूर होण्यात मदत मिळते.



**त्वचा रोग दूर होतात**

रात्र भर शंखामध्ये पाणी भरून ठेवावे. सकाळी या पाण्याने शरीरावर मालीश करावी. याने त्वचेसंबंधी रोग दूर होतात.

**ताण दूर होतो**

शंख वाजवल्याने डोक्यातील सर्व विचार दूर होतात आणि ताण कमी होण्यात मदत मिळते.

**नकारात्मकता दूर होते**

शंख वाजवताना त्यातून ॐ ध्वनी बाहेर पडते ज्याने नकारात्मकता दूर होऊन घरात सकारात्मकता पसरते.

**हार्ट अटॅकपासून बचाव**

नियमित शंख वाजवणाऱ्यास हार्ट अटॅकचा धोका नसतो. शंख वाजवल्याने सर्व ब्लॉकेज उघडून जातात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

ती म्हणे राम राजा झाला की कौसल्या राज माता होईल . पुढे रामाच्या मुलाला गादी मिळेल भरताचा मुलाला नाही.भरताला सुद्धा ते काढून देतील.कैकयीला दुर्लक्षित केले जाईल.तू केवळ आश्रित राहशील.तू उठ,चिडचिड कर दशरथाकडून कांहीं वर मागून घे.रामाला अभिषेक झाल्यावर मग काय उपयोग.मंथरेने असे तर्क दिले की, जे बिन तोड होते. तिला ते खरे वाटले.तिला वाटले नवऱ्याने मागे आपणास २ वर दिले होते, ते आता मागून घेण्याची वेळ झाली.ती रागावून कोप भवनात गेली.अयोध्येत कोप भवन कित्येक पिढ्यात उघडलेच नव्हते.ही बातमी दशरथाला कळाली की त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. दशरथ समजावण्याचा प्रयत्न करू लागले. तिने पहिल्या वराने भरतास राज्याभिषेक व दुसऱ्या वराने रामास १४ वर्षे वनवास (नव पंच वर्षांनी.. म्हणजे ९ अधिक ५ म्हणजे १४) पहिला वर भरतास राज्य या साठी की रामास वनवास प्रथम मागितले तर दशरथ लगेच मरेल मग भारतास राज्य तसेच मिळायचे राहील.एक वेळ दशरथ भरतास राजा करतील पण रामास वनवास हे ते कधीच सहन करणार नाहीत.ते कैकयीच्या पायावर डोके ठेऊन दया कर म्हणून रडू लागले.कैकयी ऐकण्यास तयार नव्हती. ते चिडले,तुला सोडून देईल म्हणाले पण उपयोग झाला नाही.इंद्रासाठी लढताना कैकयीने मदत केली होती त्या वेळी त्यांनी यशाचे श्रेय हिच्या मदतीला दिले व दोन वर माग म्हणाले.तिने आता राहू द्या.पुन्हा मागेंन असे म्हणाली.ते हे वर होते. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

# फुलमाला....




सुरंगी...


कोकणातल्या नाजूक सुंदर सुरंगीचा
खूप लुभावणारा असतो वळेसर

देवाच्या मूर्तीवर तर खुलून दिसतोच
रमणीच्या शोभतो सैल अंबाड्यावर

याच्या सुगंधात मन अगदी हरवून जाते
पण हे सुरंगीचे फूल इकडे क्वचित मिळते

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ - भाग दोन

त्यानंतरचा त्यांचा प्रवास समुद्रमार्गे झाला. अटलांटिक महासागरातून प्रवास करत ते ब्यूनॉस आयर्सला पोहोचले. या सततच्या प्रवासाने मात्र ते आजारी पडले. परंतु त्या ठिकाणी त्यांची एक चाहती असलेल्या व्हिक्टोरिया उकांपू या तरुणीने त्यांची अतिशय हळुवार आणि प्रेमपूर्वक शुश्रुषा केली. तिच्या काळजीपूर्वक केलेल्या सेवा आणि शुश्रुषा यामुळे रवींद्रनाथ या मोठ्या आजारातून बरे झाले. त्या दोघांमध्ये स्नेहबंध निर्माण झाले. रवींद्रनाथांनी त्या ठिकाणी आपल्या काही कविता लिहिल्या आणि त्या कवितांचे पुस्तक व्हिक्टोरियाला अर्पण केले.

बरे झाल्यानंतर त्यांनी नेपल्स, इटली, स्विझर्लंड या देशांना भेटी दिल्या. त्यातही अनेक लोकांना ते भेटले. नंतर पुन्हा १९२७ मध्ये ते विविध देशांच्या दौऱ्यावर बाहेर पडले. या त्यांच्या दौऱ्यात सिंगापूर, इंडोनेशिया आदी देशांचा समावेश होता. या दौऱ्यात त्यांच्याबरोबर सुप्रसिद्ध भाषा शास्त्रज्ञ प्रोफेसर सुनीती कुमार चॅटर्जी आणि चित्रकार सुरेंद्रनाथ कार हे दोघे होते. ईस्ट इंडीज मधील वास्तव्यात चित्रकार सुरेंद्रनाथ यांना तिथे कापडावर छापलेली एक डिझाईन खूप आवडली. तिला बाटीक असे म्हटले जात होते. एका विशिष्ट पद्धतीचा वापर करून वक्ररेषांमुळे तयार झालेल्या या मनोवेधक प्रकाराला स्वतःचे असे खास सौंदर्य आहे. सुरेंद्रनाथ यांनी ते बाटिक तंत्रज्ञान आत्मसात केलं आणि आपल्या सोबत श्रीनिकेतनला आणलं. तिथे त्यांनी ही कला शिकवली. या कलेच्या सौंदर्याने लोकांना तिच्याकडे आकर्षित केले आणि आता तर एक आधुनिक डिझाईन म्हणून या कलेला खूपच लोकप्रियता मिळाली आहे.

नंतर त्यांना कॅनडाला येण्याचे निमंत्रण मिळाले. महान साहित्यिक म्हणून लोक रवींद्रनाथांना ओळखत होतेच पण आता रवींद्रनाथांची कीर्ती एक महान शिक्षणतज्ज्ञ म्हणूनही पसरली होती. त्यामुळे त्यांना एका अधिवेशनात शैक्षणिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी बोलावले गेले. त्यांचे कॅनडातील वास्तव्य फक्त दहा दिवसांचे होते. त्यावेळी कॅनडातील श्रीमंत लोकांना एक छोटासा पंखा हातात बाळगण्याची सवय होती. चाहत्यांच्या आग्रहामुळे रवींद्रनाथांना या पंख्यावर सही करणे भाग पडत होते. ती सही करताना ते काही स्वरचित ओळी त्यावर लिहून देत. त्यांच्या या अशा त्यांच्या छोट्या रचनाही एक पुस्तक सहज प्रकाशित होईल इतक्या जमा झाल्या. आणि त्यांचे पुढे फायर फ्लाईज ( विचारांच्या छोट्या ठिणग्या ) नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यातील एक रचना उदाहरण म्हणून या ठिकाणी पाहू.

'' दिवस म्हणजे रंगीबेरंगी बुडबुडे.
रात्रीच्या अथांग पृष्ठभागावर तरंगणारे...''

यादरम्यान युरोप अमेरिकेत त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. त्यांच्या चित्रकलेच्या नवीन वैशिष्ट्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले. खरंतर वयाच्या साठाव्या वर्षानंतर रवींद्रनाथांनी चित्रकला शिकायला सुरुवात केली होती. आपल्या लेखनात दुरुस्त्या करत असताना ते त्यात लय साधलेला एखादा आकार काढत आणि मजेशीर आकृत्या तयार होत. मग त्यांनी चित्रे काढायला सुरुवात केली. आणि कलेच्या या प्रांतात लेखणी आणि कुंचला (ब्रश) या दोन्हींचाही वापर ते करू लागले. आणि ओघानेच इतर चित्रेही रेखाटू लागले. त्यांच्या या अनोख्या शैलीच्या रंगचित्रांमुळे युरोपीय जनतेत त्यांच्या चित्रांबद्दल आकर्षण निर्माण झाले. याविषयीची दुसरी बाजू अशी म्हणता येईल की आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात देखील नवनवीन गोष्टी शिकण्याची आणि प्रयोग करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्याजवळ होती. त्यांच्या सृजनशील मनाची प्रगल्भता यात आपल्याला आढळून येते.

(क्रमशः)

# भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार

ज्योतिर्मय साहित्य

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात. एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा

रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात. त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला. असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल. त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

***

# पंढरीची वारी ! अवघ्या भक्तांसी तारी !

ज्योतिर्मय साहित्य



नंतर पून्हा विठ्ठलाचं दर्शन घेऊन बसने घरी जाता! आम्ही नंतर बसने घरी जातो. तर बाबा म्हणाले, मी बसने जात नाही. पून्हा पालखीच्या दिंडीसोबत चालतच घरी जातो. बघा लोकहो! म्हणजे बाबा देवाच्या पालखीसोबत पंढरपूरला जातात. पून्हा देवाला घेवून परतीच्या प्रवासात आळंदीला देवाच्या मंदिरात जातात. तिथून मग स्वतःच्या गावी घरी जातात चॅनेलवाले म्हणाले, सोबत तुम्हाला काही खायला लागतं का! बाबा म्हणाले, काही लागत नाही. फक्त, एकदा फुल्लं जेवण केलं की, बासं! बाकी काही लागत नाही. कधी आजारी पडतात का! आजारी वगैरे कधीही पडत नाही. थंडी वाजत नाही, ताप येत नाही, खोकला, सर्दी पडसं होत नाही. कुठं कधी लागलं नाही. एकदा पंढरीची वारी केली की, कधीही कसलाच त्रास होत नाही मग, कधी बरं वाटलं नाही तर एखादी औषधाची गोळी घेता का! बाबा म्हणाले, मला एक पैशाची औषधाची गोळी नाही. पाहिजे तर झडती घ्या! लोकहो ऐका! बाबांना कसलीचं औषधांची गोळी नाही. फक्त पांडुरंग नावाची औषधाची गोळी आहे. बोला! पंढरीनाथ महाराज की जय! संत ज्ञानेश्वर माऊली की जय!संत तुकाराम महाराज की जय! संत नामदेव महाराज की जय! संत निवृत्तीनाथ महाराज की जय! असा हा वारक-याचा मेळा, विठ्ठलाच्या लाखों भक्तांचा मेळा हळूहळू विठ्ठलाच्या भेटीच्या, दर्शनाच्या आतूरतेने, उत्कंठतेने पंढरीला पोहोचतो. सर्व वारक-यांना विठ्ठल भेटीचा निखळ आनंद उपभोगायचा असतो. त्यासाठी, ते आतूर झालेले असतात.

'' पंढरीचा वास चंद्रभागे स्नान
आणिक दर्शन विठोबाचे ''

यातच कृतार्थता मानणारा पंढरीतला वारक-यांचा विराट मोठा जनसमुदाय असतो.

पंढरपूरात एकमेकांना भेटले सर्व आबालवृद्ध,


स्त्रीपुरूष व सगळे अठरापगड जातीचे वारकरी

सगळ्यांचं दैवत एकच, सगळ्यांचे भाव एकच, आचारविचार, उच्चार एकच संप्रदायाने घालून दिलेला व न चुकता सगळ्यांनी अंगिकारलेला संस्कार एकच म्हणूनच भागवत धर्माची पताका वारंकरी संप्रदायाने निरंतर फडकत ठेवली आहे. सर्वांभूती एकत्वाची प्रचिती तेथे अनुभवायला मिळते. देहरुप आविष्कार वेगवेगळे असले तरी आतून सगळे विठ्ठलमयच असतात. गेल्या कित्येक पिढ्यांच्या या भावरुप नद्या या चंद्रभागेला येऊन मिळाल्या आहेत आणि ती चंद्रभागा भवसागर पार करुन देणा-या विठूरायापर्यंत त्या सर्वांना घेऊन जात आली आहे. म्हणून, ''तिर्थ विठ्ठल!क्षेत्र विठ्ठल!''

अशी प्रचिती या पंढरीत येते. पंढरीत

## चला वारीला

लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर,पुणे
९४२१३७५६९१



व्यवहारापलिकडचं जग असतं. त्या जगात प्रेम, शांतता, साधेपणा, सच्चाई, निरपेक्षपणे मदत व निर्मळ विचार इतक्या सर्व गोष्टी निर्मोही मनाने अनुभवायला मिळतात. यासारखं अमृतभाग्य ते काय! हे अनुभवणारे खरेच!महद्भाग्यवान असतात. म्हणूनच, सगळी भक्तमंडळी आणि वारकरी विठूरायाच्या चरणीं एकच मागणं मागत नतमस्तक होतात!

'' हेचि घडो मज जन्मजन्मांतरी
मागणे श्रीहरी नाही दूजे ''

इतकी साधी प्रार्थना जगणारी माणसं पाहिली की, आणि त्या सगळ्यांना तसं वागण्याची अखंड प्रेरणा देणारी बाप आणि आई माझी विठ्ठल रखुमाई की जीवन धन्य धन्य होतं. कृतार्थ होतं. असा अगाध महिमा आहे पंढरीचा

आणि पांडुरंगाचा! शाबासकीचं आकर्षण किंवा शिक्षेची भीती न दाखवताही चांगलं वागायला शिकविणारी ती तुमची आमची माऊली अवघाची संसार सुखाच्या करणा-या ज्ञानोबांनाही माहेर देणारी ती जगाची माऊली

विठूमाऊली तिच्या चरणी माझा नम्र दंडवत!

जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल! सर्व भक्तांना सांभाळणा-या अशा या विठूमाऊलीचं गुणवर्णन करणारी माऊलींच्याच कृपेने मज कडून झालेली कविता खालीलप्रमाणे आहे.

विठ्ठला:तूच माझा मायबाप
मायबाप विठ्ठला!भगवंता!
तूच आहेस अवघा परब्रह्म!
तूच निर्गुण!तूच निराकार!
सर्वत्र असशी तूच साकार
अवघ्या भक्तांचा वाहसी
त्यांच्या जीवनाचा संसार
मी पामर काय वर्णू तुझी ख्याती
अवघ्या विश्वाचा तूच अधिपती!
ध्याता तुजला तव भक्त मनोभावे
त्वरे धावसी!हरण्या संकट त्यांचे
तुजजवळ नसे कदापि भेदभाव
वा-याक-यांच्या उरी रे! प्रेमभाव
हा तुझ्याच प्रेमाच्या आहे प्रभाव!
म्हणूनी!भक्तांमध्ये राहे बंधुभाव!
चरणांवरी तुझिया टेकूनी डोई
अवघ्या भक्तांचे समाधान होई
आषाढी,कार्तिकी भक्तजन येती
पंढरीला दर्शन घेऊनी तृप्त होती
जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल!
जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल!
अठ्ठावीस युगे कटीवरी हात ठेवूनी
भक्तांसाठी उभा आहे देव पांडुरंग!



## इंदापूरी निखारे

## सज्जन पणाचा आव...



ज्योतिर्मय साहित्य

कॉलेज मधे शिकायला लागलो तसे शिक्षणा बरोबर अनेक गोष्टी कोणी न शिकवताच शिकलो. म्हणजे मी हुशार होतो हे परत सांगत बसत नाही आणि त्यामुळे झाले काय की अचानक अनेक मित्र पण शिकायलाच यायला लागले . बऱ्याच मित्रांनी पहिली सिगरेट आणि पहिली बियर कशी प्यावी? हे माझ्याच कडुन शिकले. याचा मला तर फार अभिमान आहे... आता ते मान्य करतील किंवा नाही हे माहित नाही, पण ते अजुन मित्र आहेत हे मात्र नक्की... तर असाच एक दिवस सिगरेट चहा प्यायला टपरीवर, घरी चहा पिल्यानंतर निघालो. घरी चहा पिल्यानंतर टपरीवर जाऊन सिगरेट चहा पिण्याचा आनंद वेगळा असतो हे अनेक आता जे मान्यवर आहेत त्यांना माहित असणारच. टपरीवाला खुप चांगला होता. कॉलेजमध्ये असतांना मित्र आणि टपरीवाला हे दोघे तुम्हाला साथ देणारे असतील तुम्ही कॉलेज जीवन एंजॉय केले हे सांगायची गरज पडत नाही. तर सिगरेट घेतली चाचा कडुन अन चाचा म्हणाला... भाई तो माणुस तुम्हाला भेटायचं म्हणत आहे ... मी विचारले कोण आहे? तुमच्या ओळखीचा आहे का ? चाचा म्हणाला हो आणि त्याला हाक मारली अब्दुल भाई आओ ... तो आला, त्याने अतिशय आदराने नमस्कार केला . आयुष्यामधला पहिला माणुस म्हणजे अब्दुल भाई, एव्हढ्या आदराने नमस्कार करणारा! पण मी तसा घाबरलोच, मनात विचार केला उगीच सज्जन पणाचा आव नको आणायला ... मी त्याच्या गळ्यात हात टाकला आणि विचारले काय काम आहे ? तो अतिशय आदराने म्हणाला आपण चहा घेऊ या... त्या दिवसापासून मी आदराने कसे बोलावे? एखाद्या अपरिचित माणसाला भेटल्यावर हे शिकलो... चहा नको, मी म्हणालो काम सांगा . तो माझ्या पेक्षा प्रचंड आडदांड पण लाजुन आणि नम्र विनंती करत म्हणाला भाई चहा घ्या ना माझ्या बरोबर ... आपको बुरा तो नहीं लगेगा ना ? चहा नको म्हणालो म्हणून असेल ... अब्दुल चेहरा सांगत होता मी दुसऱ्या जातीचा आणि बरेच काही ... माझ्याच लक्षात आले मी म्हणालो चल घेऊ या .एकदम खुश झाला आणि चहाच्या टपरीत गेलो त्याला पाहताक्षणी टपरीच्या मालकाने पटकन जागा करून दिली आणि न सांगताच चहा पण आणुन दिला ... चहा पिता पिता... मी विचारले अब्दुल भाई काम काय ते सांग ना... त्याने खिशात हात घालून, अतिशय प्रेमाने सांभाळून ठेवलेले पोस्ट कार्ड काढले. सन्मान पत्र जसे देतात तसे ते पोस्ट कार्ड माझ्याकडे दिले.दोन तीन दिवसा पूर्वी आलेले दिसत होते ... ते माझ्याकडे दिले अन म्हणाला,आईचे पत्र आले आहे वाचुन दाखवाल का? त्याच्या डोळ्यात असलेले भाव पाहून मी अंतर्मुख झालो. कधी कधी आईवर चिडचिड करायचो ते आठवले... मी लगेच वाचुन दाखविले ... खुश झाला तो... मला म्हणाला यांचे उत्तर द्यायचे लिहुन देणार का ? मी म्हणालो का नाही ... त्याने बाहेर उभा असलेल्या पोराला हाक मारली व पोस्ट कार्ड आणायला सांगितले ... उत्तर लिहुन दिले ... मला म्हणाला परत जेव्हा पत्र येईल तेव्हा टपरीवर निरोप ठेवीन ... मी त्याला माझे घर दाखविले आणि केंव्हाही येत जा आणि मी नसलो तरी माझा भाऊ बहीण कोणी पण हे काम करेल ... भाई मी मुसलमान आहे... मी कसाई आहे... घरी नको, मी निरोप ठेवत जाईल... मी पण त्याला हट्टाने घरीच यायला सांगितले ... बरेच दिवस तसे टपरीवर भेटायचो! पत्र लिहिणे वाचणे हा कार्यक्रम सुरु होता ... एक दिवस सकाळीच आला अब्दुल... आईला सांगितले आई मित्र आलाय, तो म्हणाला बाहेरचं जाऊ .त्याला म्हणालो नाश्ता करु या आणि मग जाऊ आई सोडणार नाही ... आईने हाक मारली ... मी दोन डिश बाहेर घेऊन आलो ... महाशिवरात्र होती ... आईने साबुदाण्याची खिचडी केली होती ... आता मी मनात विचार केला हा जर नको म्हणाला तर आग्रह नको करायला ... त्याला म्हणालो यार आज उपवास आहे साबूदाणा खिचडी चालेल का ? त्याला काही कळे ना ... तेव्हढ्यात आई पाणी घेऊन आली ... मी आईला सांगितले आई हा माझा मित्र अब्दुल ... त्याने आईला नमस्कार केला ... त्याच्या मनात ज्या काही शंका आल्या असतील त्या बहुतेक निघुन गेल्या असाव्यात,कारण आईची पण ओळख करून दिली ... जाता जाता आई त्याला म्हणाली अजुन लागली तर सांगा ... त्या आधी किंवा त्या नंतर कधी अब्दुलनी साबुदाणा खिचडी खाल्ली का नाही? माहीत नाही, पण आम्ही मित्र कायम राहिलो.नंतर त्याची आई रहायला इकडे आल्या मुळे पत्राचा काम राहिले नाही ... एक दिवस त्याने मला त्याच्या कडे जेवायला बोलाविले, अम्माने सांगितले आहे,मी पण हो म्हणालो पण मी फक्त चिकन खातो...

तसे त्याच्या आईला मला भेटायची उत्सुकता होतीच ... त्यामुळे झाले काय... अशा काही मित्रांमुळे मला कायम सज्जन राहावे लागले...

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# जिंदगी जिंदा-दिली को जाने ऐ रोशन वरना कितने ही यहाँ रोज फना होते है...!




**ज्योतिर्मय साहित्य**

ठाकुर रोशनसिंह हे एक महान क्रांतीकारक होते. ज्यांनी भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण दिले. देशासाठी त्यांनी दिलेले बलीदान अंध:कारात उजेड निर्माण करणारे क्रांतीचे चिन्ह होते. त्यांच्यासारख्या वीर पुत्रांमुळे भारतमाता कायमच गर्वाने भरलेली राहील. मातृभूमीसाठी त्याग, राष्ट्रासाठी अभिमान आणि गौरव यासाठी जीवन अर्पण करणाऱ्या अशा वीर सपूतांमुळे आपण सारे त्यांचे ऋणी आहोत. काकोरी रेल्वे लूट कट खटला या घटनेत सहभागी नसतानाही शचीन्द्रनाथ संन्याल, योगेश चटर्जी आणि ठाकूर रोशनसिंह यांना गोवण्यात आले. हे तिन्ही स्वातंत्र्यसेनानी लढावू आणि नेतृत्व करणारे स्वातंत्र्ययोध्दे. या खटल्यामध्ये गोवण्यात आलेले शचीन्द्रनाथ संन्याल आणि योगेशचंद्र चटर्जी आधीपासूनच विविध आरोपांमुळे केदैत असल्याने हे दोघेही फाशीच्या शिक्षेपासून बचावले. शचींद्रनाथ संन्याल यांना जन्मठेप काळेपाणी शिक्षा तर योगेशचंद्र चटर्जी यांना दहा वर्षे सक्तमजुरी व ते अपीलात गेल्यानंतर उलट जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली. प्रत्यक्ष काकोरी प्रकरणातील आरोपीपैकी पं. रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्रनाथ लाहिरी, अशफाक उल्ला खान यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्याचबरोबर ठाकूर रोशनसिंह हे या काकोरी कटात प्रत्यक्ष सामील नसतानाही त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. ७ एप्रिल १९२७ रोजी ठोठावण्यात आलेली ही फाशीची शिक्षा १९ डिसेंबर १९२७ रोजी ठाकूर रोशनसिंह यांच्यासाठी अलाहाबादच्या नैनी जेल तुरूंगात अंमलात आणण्यात आली. फाशीच्या अंमलबजावणीनंतर प्रचंड मोठ्या प्रमाणात शोकयात्रा काढण्यात येऊन अंत्यसंस्कार करण्यात आले. ठाकूर रोशनसिंह यांच्या झिंदाबाद या घोषणेने संपूर्ण परिसर दुमदुमला आणि तरुण पिढी मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली. ठाकूर रोशनसिंह यांचा आदर्श स्वातंत्र्यलढ्याला प्रेरक ठरला.

ठाकूर रोशनसिंह यांनी ६ डिसेंबर १९२७ रोजी अलाहाबादच्या नैनी जेलमधील कालकोठडीतून आपल्या एका मित्राला लिहिलेले पत्र आजही त्यांचे विचार आपली मती गुंग करतात. ते आपल्या पत्रात म्हणतात... ''एक आठवड्याच्या आतच मला फाशी होईल. ईश्वराची प्रार्थना आहे की, माझ्या मृत्यूसाठी तुम्ही दु:खी होऊ नका उलट आनंदी व्हा. जगात जन्म घ्यावी ही गरज आहे, पण मरण देखील आवश्यक आहे. दुष्टतेला दुष्टतेने उत्तर देऊ नका. मरण्याच्या वेळेस ईश्वराचे स्मरण करा. हीच गोष्ट मी सर्वांना सांगू इच्छितो की, ईश्वराच्या कृपेने मी फार शांत आहे. म्हणून माझा मृत्यू हा कुणाच्याही दु:खाचा किंवा शोकाचा विषय नाही. मी गेली दोन वर्षे माझ्या पत्नी आणि मुलांपासून दूर आहे. या वेळात मला ईश्वरस्मरणाचे फार लाभ झाले. त्यामुळे माझी मोह, तृष्णा आणि कोणतीही आशा राहिलेली नाही. माझा पूर्ण विश्वास आहे की, जगाच्या कष्टमय प्रवासाची माझी अखेर असून मी आता शांतीच्या जगात प्रवेश करतो आहे. आपल्या धर्मशास्त्रांमध्ये लिहिलं आहे, ''जो पुरुष धर्मयुद्धात प्राण देतो, त्यालाही तीच गती मिळते जी जंगलात तपश्चर्या करणाऱ्या संतांना मिळते.'' पत्र संपविताना ठाकूर रोशनसिंह यांनी शेर लिहिला आहे.


''... जिंदगी जिंदा-दिली को जाने ऐ रोशन
...वरना कितने ही यहाँ रोज फना होते है...!

या ओळी अतिशय अर्थपूर्ण आहेत. येथे ''जिंदगी जिंदा-दिली को जान'' याचा अर्थ आहे.... खरे जगणे म्हणजे जिद्द, धैर्य व प्रेरणा देणारे जीवन. ''वरना कितने ही यहाँ रोज फना होते है'' म्हणजे दररोज अनेक लोक मरतात पण ते जीवन प्रेरक ठरत नाही. या पत्रातून ठाकूर रोशनसिंह यांची आध्यात्मिक शांतता, कणखर श्रध्दा आणि वीरमरणाचे तेज स्पष्ट दिसते. त्यांनी मृत्यूच्या छायेत सुध्दा शांतपणे विचार केला. कुटुंबाला शांततेचा सल्ला दिला आणि देशसेवेच्या कर्तव्याला पूर्ण न्याय दिला.

ठाकुर रोशनसिंह यांचा जन्म २२ जानेवारी १८९२ रोजी उत्तर प्रदेशातील शाहजहांपुर जिल्ह्यातील नावडा गावातील कौशल्यादेवी यांच्या पोटी झाला. त्यांच्या वडिलांचे नांव ठाकूर जंगीसिंह हे होय. त्यांचा पूर्ण परिवार आर्य समाजाशी निगडीत होता. पाच बहीण-भावांत ते ज्येष्ठ होते. सुरवातीच्या काळात ते विविध खेळ खेळत होते. त्यांनी शार्पशूटर आणि कुस्तीगीर म्हणून प्रसिद्धी मिळविली होती. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वयंसेवक दलाचे क्रियाशील कार्य करीत होते.प्रथम महायुध्दाच्या सुवर्णसंधीचा काहीही उपयोग न होता शतावधि क्रांतीकारकांच्या जीवनांची आहुती पडूनही या रणयज्ञांतून स्वातंत्र्यसिंहासनाची निर्मिती होऊ शकली नाही. भारतमातेच्या पायांतील दास्यशृंखला आधिकच घट्ट झाल्या व इंग्रजी राजसत्ता विकट हास्य करीत आपली पकड अधिकच आवळू लागली. लोकमान्य टिळकांसारख्या दीर्घदर्शी पुरुषांचे महाप्रयाण याच सुमारास होऊन गांधीजींच्या नेतृत्वाखाली सारा भारत एका नव्या मार्गाची वाटचाल चालू लागला होता.' लोकांच्या अंत:करणातील स्वातंत्र्याची आकांक्षा उत्कटतेनं प्रज्वलीत झाली होती. गांधीजींनी प्रवर्तित केलेल्या असहयोगाच्या अभिनव मार्गाकडे लोक स्वाभाविकपणे आकर्षित झाले. एक वर्षात स्वराज्य ही त्यांची घोषणा तर सर्वसामान्य जनतेला सहजच दिङ:मूढ करणारी होती. नोव्हेंबर १९२१ मध्ये जेव्हा ब्रिटिश सरकारने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वयंसेवक दलावर बंदी घातली तेंव्हा स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या निर्णयाला विरोध केला. असहयोगांतून स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीने काहीही निष्पन्न होणार नसल्याचे ज्या क्रांतीकारकांना वाटले त्यातील प्रमुख नांव म्हणजे ठाकुर रोशनसिंह.ब्रिटीश अधिकाऱ्यांना विरोध करीत ठाकूर रोशनसिंह यांनी शाहजहांपुर जिल्ह्यातील काँग्रेस स्वयंसेवकांच्या गटाचे नेतृत्व बरेली प्रदेशात केले. ब्रिटीश सरकारने काँग्रेस स्वयंसेवक दलावर बंदी घातल्याच्या निषेधार्थ मिरवणूक काढण्यात आली. ब्रिटीश भारतीय पोलिसांनी मिरवणूक संपवण्यासाठी गोळीबार सुरू केला. या गोळीबार प्रसंगी ठाकूर रोशनसिंह यांनी एका पोलिसाची रायफल हिसकावून घेत उलटा गोळीबार सुरु केला. त्यामुळे पोलिसांना पळ काढावा लागला. ठाकूर रोशनसिंह यांच्यावर केस होऊन त्यांना दोन वर्षाची शिक्षा बरेलीच्या सेंट्रल जेल मध्ये वामशक्कत कैद म्हणून भोगावी लागली.

१९२२ मध्ये असहयोग आंदोलन महात्मा गांधींचे नेतृत्वाखाली चालू असताना 'चौरी चौरा' घटना घडल्याने गांधीजींनी असहकार आंदोलन थांबविले. यामुळे जहाल क्रांतीकारक गट पुन्हा नव्या उमेदीने स्वातंत्र्यलढ्यात उतरला. ठाकूर रोशनसिंह हे राजेंद्रनाथ लाहिरी, रामदुलारे त्रिवेदी व सुरेशचंद्र भट्टाचार्य यांच्यासह पं. रामप्रसाद बिस्मिल यांना भेटून नव्याने स्थापन झालेल्या हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संघटनेत सामील झाले. ठाकूर रोशनसिंह यांच्यावर पक्षाच्या तरुण सदस्यांना नेमबाजीचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी देण्यात आली. हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संघटनेसाठी व त्यांच्या मोहिमांसाठी निधी गोळा करण्याच्या यंत्रणेच्या प्रमुखांमध्ये ठाकूर रोशनसिंह यांचा समावेश होता. नुसती ज्वलजहाल पत्रके काढणे एव्हडेच या संघटनेचे उद्दिष्ठ नसून ज्वलजहाल कृत्ये करणे हेही उद्दिष्ट होते. त्यासाठी शस्त्रे आवश्यक असल्याने शस्त्रसंग्रह करणे तसेच क्रांतीकारक चळवळीत मुरलेलेच लोक संस्थेत असल्यामुळे बॉबस् तयार करणे यासाठीही धनसंचय आवश्यक होता. नवीन शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी या संघटनेतील क्रांतीकारक कुशल होते. आवश्यक धनसंचय मिळविण्यासाठी दरवडे घालणे अनिवार्य झाल्याने ९ मार्च १९२३ रोजी बिचपुर येथे, २५ डिसेंबर १९२४ रोजी बमशैली येथे तर २४ मे १९२५ रोजी व्दारकापूर येथे संघटनेतर्फे दरोडे घालण्यात आले. यातील डिसेंबर १९२४ रोजी बमशैली येथे ठाकूर रोशनसिंह यांचे नेतृत्वाखाली शचिंद्र बक्षी,मन्ययनाथ गुप्त, पं. रामप्रसाद बिस्मिल व चंद्रशेखर आझाद यांनी सावकार बलदेव प्रसाद यांच्या घरावर दरोडा घातला. ख्रिसमसच्या दिवशी घातलेल्या या दरोड्यात ४००० रुपये तसेच सोने-चांदीच्या वस्तू त्यांना मिळाल्या. परंतु मोहनलाल पहलवान नावाच्या व्यक्तीने या दरोड्यास विरोध केल्याने ठाकुर रोशनसिंह यांच्या रायफलीमधून मारलेल्या गोळीने त्याचा मृत्यू झाला.

(क्रमश:)



# बाबाचं पत्र सापडलं...!




**ज्योतिर्मय साहित्य**

मी लहान असताना मित्रांसोबतखेळ खेळायचो

मामाचं पत्र हरवलं तेच मला सापडलं.

असंच माझं बालपण परभणीत हसत खेळत, कधी आईच्या प्रेमळ हाताचा धम्मक लाडू तर कधी बाबांचे टप्पू खाऊन पुढे सरकत आणि संपत गेलं, आणि हळूहळू मी मोठा होत गेलो.

मात्र अचानक एक दिवस नको तो उजाडला. १२ जून १९९४. या दिवशी माझे बाबा हृदय विकाराने अचानक गेले. बाबांच्या अश्या जाण्याने घरावर फार मोठं संकट कोसळलं. माझ्या तर पायाखालची जमीन सरकली. एकमेकांना आधार देत मी आई आणि माझी पत्नी रचना एकमेकांना सावरत गेलो आणि पुन्हा आयुष्य पुढे सरकू लागलं.

खरं तर बाबा कितीही रागीट असले, तरी कधी टप्पू दिल्यानंतर डोसा खायला न्यायचे तर कधी आईसक्रीम तर कधी कधी गांधी पार्कमधील हॉटेल शेळके कडील प्रसिद्ध असलेला मसाला वडा खाऊ घालायचे, हे मी कधीच विसरू शकत नाही, आणि मग हा लहान पोरगा खुष व्हायचं, सगळा राग, मार विसरून.

हे सारं एका क्षणात आठवलं आणि आज कळतंय की बाबा मनातून मला कधीच रागावत नसत, मारत नसत.

बाबा गेल्यानंतर एकदम सर्व जबाबदारी अंगावर पडली. मला नौकरी लागुन जेमतेम चार वर्ष झाली होती. माझी पत्नी सुवर्णा, रचना होऊन आमच्या घराची रचना सजवू लागली होती.

आणि माझी ज्येष्ठ कन्या फक्त ६ महिन्यांचं गोड बाळ होती.

आणि मग आईला कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यासाठी जी कागदपत्रे लागतात, त्यातील

काही कागदपत्रे शोधण्यासाठी मी माळ्यावर असलेला संदूक खाली काढला, काही महत्वाची कागदपत्रे शोधण्यासाठी.

मला जे हवं होतं? ते तर सापडलं पण अजून एक विलक्षण गोष्ट सापडली आणि ती म्हणजे, माझ्या बाबाचं पत्र. हो माझ्या बाबाचं पत्र.

आणि ते पत्र मी वाचायला घेतलं. तो कागद खुप जीर्ण झाला होता, त्यावरील अक्षर अतिशय पुसट झाली होती ते पत्र १९७७ ला लिहलेले होते, त्यावेळी मी चौथीला होतो.

बाबांना त्यात लिहिले होते, बेटा गिरीश,

बाबांनी मला, बेटा लिहिलेले वाचून नकळत डोळ्यातून अश्रूंचे काही थेंब त्या पत्रावर पडले,

कसे बसे अश्रू पुसुन मी ते पत्र वाचू लागलो.

बाबांनी त्यात पुढे लिहिले होते,

बेटा, तुला मी तुझ्या लहानपणी नेहमीच रागावत आलोय, कधी वेळ प्रसंगी तुला कोंबडा करून भिंतीकडे कान करून उभे टाकायला लावले.

याच कारण, तू खुप हट्टी होत चालला होता, शेंडेफळ म्हणून तू तुझ्या आईचा खुपच जास्त लाडका होता. त्यामुळे तुला जे पाहिजे ते तू हट्ट करून मिळवण्याचा प्रयत्न करत असे.

पण बेटा, आयुष्य इतकं सोपं नसतं. तू आमचं शेंडेफळ. तुला जे हवं ते ते देण्याचा आम्हा दोघांचा प्रयत्न होताच पण एखादी गोष्ट हवी की लगेच ती मिळालीच पाहिजे हा अट्टाहास कधीच कामाचा नसतो, हे तुला मोठं झाल्यावर कळेलच.

तुला मला खूप शिकवायची ईच्छा असूनही आर्थिक अडचणीमुळे तू लवकर आपल्या पायावर उभे रहा हे नेहमीच सांगत आलो.

प्रत्येकाच्या आयुष्यात चढउतार येत असतात, हे तुला आताच नाही कळणार. तू अजून खुप लहान आहेस पण हे पत्र जेव्हा तू वाचशील तेंव्हा तू बऱ्यापैकी कळता असशील.

तू अठरा वर्षापेक्षा जास्त मोठा झालास की आपल्या पायावर उभे टाकायचा लवकर प्रयत्न कर,अर्थातच कमविण्याचा प्रयत्न कर.

कारण आपल्या घरात तू सर्वात लहान आहेस.

तुझ्या तीन बहिणीचे लग्न, सर्वांचे कधी कधी आलेले आजारपण, तुझ्या दादाचे उच्च शिक्षण, नंतर त्याचे आजारपण तुम्हा सर्वांचे शिक्षण आणि नातेवाईकातील लग्न कार्य या साऱ्यामुळे माझी झाकली मूठ सव्वा लाखाची असेच समज कारण ती तशी कधीच नव्हती आणि भविष्यात फक्त सेवानिवृत्ती एवढीच काय ती माझी पूंजी असेल.

तुझ्या करता फार काही ठेवू शकलो नाही याची खंत मला आहेच पण तू नक्की स्वतःच्या पायावर उभा राहून मोठा होशील याची तेवढीच खात्री मला आहे कारण आपल्या घरावर देवी सरस्वतीची कृपा आहे.

आणखी एक लक्षात ठेव, आपण कधीही कुणावरही अवलंबून राहण्याची वेळ येऊ

देऊ नये. कुठलेही काम लहान मोठे नसते, फक्त ते करण्याची जिद्द हवी आणि ते तू करशील

याचीही मला खात्री आहे.

प्रत्येकाच्या आयुष्यात चढउतार सुख-दु:ख, आजारपण असतेच तसंच प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाचे ही काही क्षण येतातच कधी कधी कुणाला हा अनुभव लवकर येतो तर कधी कधी कुणाला उशीरा येतो .

तू मोठा होणार, सुखी होणार यात काहीच शंका नाही पण हे जेंव्हा कधी होईल? तेव्हा मोठेपण, पैसा यामुळे तू माणसं, मैत्री, स्नेही, नातेवाईक यांच्याशी कधीही नाती तोडू नकोस, आयुष्यात माणसं जोडायचं शिक, कारण माणसांची श्रीमंती ही सर्वात मोठी श्रीमंती आहे.

आणि आपणहून कधीच कुणाच्या आड येऊ नकोस, कुणाला मदत करता आली ? तर अवश्य कर.

बाकी मला जे जे शक्य झालं ते ते देण्याचा मी प्रयत्न केला.

तुझ्या शालेय जीवनात, तू कधी कधी हळूच मला न सांगता तुझ्या आईकडून छोट्या मोठ्या कामासाठी ५० किंवा १०० रू घेत असे, ते पैसे मी मुद्दाम तुझ्या आईकडे ठेवत असे आणि तुझ्या आईला मी पैसे ठेवून गेलो असे सांगत जाऊ नको असे सांगितले होते, कारण तुझं आईवरचे प्रेम आणि आईचं तुझ्यावरच प्रेम आणखी वृद्धिंगत व्हावं म्हणून.

बेटा, माझ्यावर तू मनात रागावत असशील पण या पेक्षा दुसरा मार्ग बाबा म्हणून माझ्याकडे नव्हता.

आणि हे सारं वाचताना माझे डोळे पुन्हा पाणावले, त्या पत्रात बाबा मला माझ्याशी बोलत आहेत, असा भास होत होता, क्षणभर मी हरवलो पण पुन्हा सावरलो. आज बाबांचे शब्द अगदी खरे झाले आहेत.

मी आयुष्यातील सारे चढउतार पाहून आयुष्याच्या एका वळणावर अतिशय व्यवस्थित पुण्यासारख्या ठिकाणी स्थिरावलो आहे. आज मला काहीही कमी नाही.

मलाही बऱ्यापैकी सेवानिवृत्ती वेतन आहे, पाहिजे तेंव्हा स्वत:च्या चार चाकीत फिरतो आहे, अखंड लोक जोडण्याचा प्रयत्न करतो आहे, माझ्या दोन्ही मुली, दोन्ही जावई सारेच उच्च अभियंते आहेत.

बाबा हे सारं, तुमच्या आशीर्वादामुळे आणि शिकवणीमुळे झाले, हे सांगताना गहिवरून आलं आहे,

मी तुम्हाला कायम नतमस्तक आहे बाबा.

# पावसाशी हितगुज






**ज्योतिर्मय साहित्य**

पावसा आज तुझ्याशी मला मनसोक्त हितगुज करावे असे वाटतेय.. हितगुज करायचे ठरवल्यावर तुझ्या किती आठवणी जाग्या मनात झाल्या. अगदी लहानपणापासून तू माझा खूप लाडका. तू येणार याची चाहूल लागली तरी मनात उधाण यायचे जे अजूनही येते. माझ्या माहेरी बाकी सगळी सुबत्ता असली तरी पाण्याचे खूप हाल होत असतं. मोठा वाडा, जनावरे त्या मुळे पाणी लागेही खूप. गावातले गणपतीचे तळे फक्त पावसाळ्यातच दुथडी भरून वाहे. परसात सगळ्या फुलांची झाडे होती. पण तुझी आषाढात चाहूल लागली की सगळे चित्रच पालटे.पेरणीची लगबग सुरू होई. तात्या परसात भाज्यांची अळी करत. पावळणी खाली मोठे हौद ठेवत. आणि मग तू सरसर करत आलास की आनंद डोळ्यात, मनात मावत नसे,त्या काळी दगडी वाडे, मातीची घरे आणि मातीचेच रस्ते त्यामुळे मृदगंध आसमंतात उधळला जात असे.भरलेले तळे बघायला आम्ही पळत जात असू. आता सारखी लपाछपी त्यावेळी तू करत नव्हतास. एकदा आषाढात आलास की चार महिने बरसतच राहत होतास. फक्त प्रत्येक महिन्यातले तुझे रूप वेगळे होई. सगळीच रूपे तुझी मनमोहक. पण श्रावणात तू अगदी खुलणे विशेष सुंदर.. परसातल्या सगळ्या झाडांना,पानांना आणि फुलांना मनसोक्त भिजायला मिळे ती अगदी सरसरून फुलून येत.माझा दिवसाचा बहुतेक वेळ फुलापानात रमण्यातच जात असे. माझ्या जाड केसांच्या दोन वेण्या आणि त्यावर वेगवेगळ्या फुलांचे लांब गजरे हा सगळ्यांच्या कौतुकाचा विषय होत असे.

पावसाळ्यातच सगळ्या सणांची रेलचेल त्यामुळे तू अजूनच लाडका.

तुझ्या माझ्या नात्याचा विचार केला तर तू मला कायमच

एखाद्या निर्मळ मित्रासारखा भेटत आला आहेस. आणि अजूनही आपली ती मैत्री कायम आहे. तू येण्याची वर्दी देणारे ते मेघदूत, तुझ्या स्वागता साठी नाचणारी,टाळ्या वाजविणारी झाडे, तो विजेचा लखलखाट आणि नादमधुर तालावर येणाऱ्या तुझ्या सरी, या सगळ्याची मला अजूनही तेवढीच भूल पडते. श्रावणात तर उन्हाशी असलेलं तुझं मैत्र आणि फुलणार इंद्रधनुष्य हे वर्णन शब्दात न मावणार.माझ्या आयुष्यातही तुझ्या सोबतीने असे अनेक श्रावण फ ुलले. तू माझ्या सुखा दु:खात कायमच सखा बनून राहिलास. तुझ्याच तालावर मी फुलपाखरा सारखी बागडलेही आणि तुझ्याच कुशीत हुंदके देत डोळ्यातला पाऊसही बरसलाही.

माझे लग्नही अगदी भर पावसातले. ध्यानींमनी नसताना ठरलेले.मिरजेत कार्यालयात येण्यासाठी तू जवळजवळ सगळ्या वाटा रोखल्या होत्यास. तू धुवांधार बरसत होतास.कदाचित माझ्या हातून निसटत चाललेला अल्लडपणा ,भविष्यातला उन्हाळा आणि माझ्या डोळ्यातील क्वचित येऊ घातलेला पाऊस याची तुला चाहूल तर लागली नसेल?

वर्षभरातच एका श्रावण शनिवारी मला मुलगी झाली.

परत श्रावण मनात बरसला. तिचीही तुझ्याशी घट्ट मैत्री झाली ती इथे असे पर्यंत पहिल्या पावसात आम्ही मनसोक्त भिजत असू. वर्षे सरली काळ बदलला आता तू पूर्वी सारखा नियमीत भेटत नाहीस, अर्थात त्याला कारण आम्हीच आहोत. कधी कधी तुझी वाट पाहायला लावणे तर कधी भयानक कोसळणे दोन्ही टोके भीतीदायक.

सगळा निसर्गच तुझ्यावर अवलंबुन आहे तू त्यांना तितक्याच प्रेमाने आणि शांतपणे नियमीत भेटावेस असे मला तुला सांगावेसे वाटते. आता मी ही आयुष्याच्या एका स्थीर वळणावर उभी आहे. तुझ्याच साथीने मी अनेक वळणे पार केली आहेत आता माझ्या आयुष्यात तू फक्त श्रावण बनून बरसत रहा. आपली निर्मळ मैत्री होती आणि ती तशीच निरंतर राहू देत हीच मनस्वी इच्छा.

तुझ्या माझ्या मैत्रीचे हे
आहेच अनमोल नाते
जन्मोजन्मी राहावे ते
असेच हसते खेळते
तू बरसशील युगानुयुगे
पण मी मातीत मिसळेन
पण पुढच्या जन्मी रोपटे
बनून पुन्हां नक्की उगवेन
मला फुलविण्यासाठी
तू नक्कीच धावून येणार
तप्त धरणीवरील मला
तुझा स्पर्श होता
मृदगंध दरवळणार
मृदगंध दरवळणार

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559